# शारीरिक शिक्षण विभाग माजी विद्यार्थी मेळावा २०१८ चा अहवाल

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभागात बुधवार दि.२८ मार्च २०१८ रोजी सकाळी ११ वाजता शारीरिक शिक्षण विभागात माजी विद्यार्थी मेळावाचे उद्‌घाटन अधिसभा सदस्य डॉ.फुलचंद सलामपुरे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ.दोस्त मोहम्मद खान (माजी प्राचार्य), विभागप्रमुख डॉ.श्रीमती डॉ.कल्पना झरीकर, प्र.संचालक डॉ.डी.आर.कांबळे यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ.दोस्त मोहम्मद खान यांनी नॅक संदर्भात माजी विद्यार्थ्याचे काय सहभाग असतो. त्यामध्ये त्यांचे कोणते योगदान आहे याविषयी सविस्तर माहिती त्यांनी दिली. प्रत्येक विद्यार्थी हा विभागाचे नावलौकिक करत असतो. त्यानुसार विभागातून तयार झालेले विद्यार्थी हे त्या विभागाचे रिपोर्ट कार्ड असतो, असे प्रतिपादन मराठवाडा अध्यापक महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.दोस्त मोहम्मद खान यांनी केले.

उद्‌घाटनपर भाषणात डॉ.फुलचंद सलामपुरे यांनी माजी विद्यार्थी विद्यार्थ्यासोबत आपल्या जीवनातील अनुभव व्यक्त केले. त्यांनी विद्यार्थ्याना येणा-या अडचणी सोडविण्यासाठी कधीही तत्पर असल्याचे सांगितले आहे. यावेळी डॉ.मीनाक्षी मुलीया व डॉ.दयानंद कांबळे यांनी माजी विद्यार्थी म्हणून आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात डॉ.कल्पना झरीकर यांनी विभागाचा प्रगती आढावा देऊन कार्यक्रमाचा समारोप केला. यावेळी विभागातील सात नेट-सेट विद्यार्थ्याचा सत्कार करण्यात आला.माझी विद्यार्थी मेळाव्यात २७ विद्यार्थ्याची उपस्थिती होती. सदरील आजी माझी विद्यार्थ्याना प्रतीभोजनाचा लाभ देण्यात आला. यावेळी गटचर्चा अंतर्गत विद्यार्थ्याशी चर्चा करुन माझी विद्यार्थ्या कडून विद्यार्थी अभिप्राय फॉर्म भरुन घेण्यात आले. श्री. सुनिल गायसमुद्रे यांनी सुत्रसंचालन तर प्रास्ताविक डॉ.ए.जे.चंद्रशेखर यांनी केले. आभार डॉ.शेखर कोठुळे यांनी मानले. कार्यक्रमासाठी श्री. रविंद्र महाजन, श्री.बबन भुजबळ, श्री.एम.एस.धनेधर व एम. पी. एड., एम. फील व पीएच. डी. संशोधक विद्यार्थी यांनी कार्यकम यशस्वीसाठी प्रयत्न केले.